॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव २९ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सर्जिकल स्ट्राईक दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून भारतीय संरक्षण दलाच्या ऐतिहासिक मोहिमेचे तरूणाईने स्मरण केले.

दोन वर्षापूर्वी भारतीय विशेष सुरक्षा दलाने पाकव्याप्त काश्मिर मध्ये घुसुन दहशतवादांचे तळ उध्वस्त केले होते. या मोहिमेचे स्मरण म्हणून शनिवारी सर्जिकल स्ट्राईक डे साजरा करण्यात आला. विद्यापीठात यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात राष्ट्रीय सेवा योजना पदवी आणि पदव्युत्तर विभाग तसेच समाजकार्य विभाग यांच्या वतीने झालेल्या कार्यक्रमात एनसीसीचे कर्नल कमांडट दिलीप पांडे म्हणाले की, भारतीय सेना ही सर्वोच्च सेना आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारतीय सेनेचा नाव लौकिक आहे. जेथे-जेथे गरज भासली तेथे चांगले कर्तव्य बजावले आहे. सर्जिकल स्ट्राईकमुळे भारताची ताकद काय आहे हे जगाला कळाले आहे. या स्ट्राईकबद्दल खुप गोपनियता पाळली गेली यात कोणत्याही वास्तुला, सामान्य व्यक्तिला अथवा प्राण्याचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली गेली. सर्जिकल स्ट्राईक हे भारतीय सैन्याचे मोठे यश होते. आंतकवाद्यांचे मोठे तळ नष्ट करून सैन्य सिमेत परत आले. अतिशय कमी वेळेत जोखीम पत्करून हे स्ट्राईक करण्यात आले असे सांगुन श्री.पांडे यांनी पर्यावरण जागरूकता, स्वच्छ भारत अभियान याबाबत तरूणांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन बारी यांनी कालबाह्य रूढी परंपरांपासून दूर राहण्याचे आवाहन यावेळी केले. यावेळी सर्जिकल स्ट्राईकबाबतचा माहितीपट दाखविण्यात आला. प्रास्ताविक डॉ.सुनील कुळकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.दिपक सोनवणे यांनी तर आभार डॉ.पवित्रा पाटील यांनी मानले. अमित माळी या विद्यार्थ्याने देशभक्तीपर गीत सादर केले.

विद्यापीठातील रसायनिक तंत्रज्ञान संस्थेत झालेल्या कार्यक्रमात कर्नल दिलीप पांडे, कॅप्टन मोहन कुलकर्णी, सुभेदार समाधान पाटील आणि नायब सुभेदार शेखर बोरसे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा.जी.ए.उस्मानी यांच्या हस्ते या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. डॉ.आर.पी.गोरे यांनी आभार मानले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 29 सप्टेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी